# तिरुपती अर्बन को-ऑप. बँक लि.
मुख्य कार्यालय : १७२, श्रध्दानंदपेठ, दक्षिण अंबाझरी मार्ग, नागपूर-१०
0712-2231772,0712-2235600 email – info@tirupatibank.com


जा.क्र. TUCB-H.O./KYC-SCN/2025-26/140 दिनांक: ११.०८.२०२५

## कारणे दाखवा नोटीस (अंतिम)

प्रती,

श्री/श्रीमती:

पूर्ण पत्ता :

भागधारक क्र.:

विषय: बँकेच्या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहुन K.Y.C. पूर्तता न केल्या प्रकरणी आपले सभासदत्व रद्द करणे सबंधीत बाजु मांडण्याबाबत.

संदर्भ: सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हयांच्या कार्यालयाद्वारे मंजूर केलेल्या तसेच रिजर्व बँक ऑफ इंडिया कडून प्राप्त ना हरकत प्रमाण पत्राच्या आधारे बँकेच्या उपविधी क्रमांक २३(i) आणि २४ (i), २४(j) अनुसार K.Y.C. चे अनुपालन करण्यासंबंधी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ३५ (१) व नियम १९६१ (नियम क्र. २८ व २९)

महोदय/महोदया,

आपण तिरूपती अर्बन को—ऑपरेटिव्ह बँक लि, चे विद्यमान भागधारक असून, आपण अजून पावेतो के.वाय.सी. दस्तऐवज सादर केलेल नाहीत, हयाबाबत खालील दिलेल्या तक्त्या नूसार आपणास वारंवार (वैयक्तीक पत्राद्वारे, वर्तमान पत्राद्वारे, बँकेच्या वेबसाईटद्वारे व प्रत्येक शाखेच्या सूचना फलकावर) सुचीत केलेले आहे, तरी देखील आपण त्याबाबत कोणतीही कृती केलेली नाही अथवा तसे दस्तऐवज सादर केले नाहीत.

| अ. क्र. | दिनांक | तपशील | उद्देश |
|---|---|---|---|
| १ | ०८.०८.२०२२ | अहवाल २०२१—२०२२ | विषय क्र. १२ सदस्यत्व रद्द करण्याबाबत |
| २ | ११.०८.२०२२ | वर्तमानपत्राद्वारे वार्षिक सभेची सुचना | विषय क्र. १२ सदस्यत्व रद्द करण्याबाबत |
| ३ | ३०.०५.२०२३ व ३१.०५.२०२३ | पत्र | के.वाय.सी. दस्तऐवज सादर करण्याबाबत |
| ४ | ३०.०५.२०२३ | शाखांचे सूचना फलक | के.वाय.सी. दस्तऐवज सादर करण्याबाबत |
| ५ | १९.०७.२०२३ व २५.०७.२०२३ | स्मरणपत्र | के.वाय.सी. दस्तऐवज सादर करण्याबाबत |
| ६ | ०१.०९.२०२३ | कारणे दाखवा नोटीस | के.वाय.सी. पूर्तता न केल्यास आमसभेत आपली बाजु मांडण्याबाबत. |
| ७ | ०१.०९.२०२३ | अहवाल २०२२—२०२३ | विषय क्र. १२ सदस्यत्व रद्द करण्याबाबत |
| ८ | ११.०९.२०२३ | वर्तमानपत्राद्वारे वार्षिक सभेची सुचना | विषय क्र. १२ सदस्यत्व रद्द करण्याबाबत |
| ९ | १९.०९.२०२३ | वर्तमानपत्राद्वारे कारणे दाखवा नोटीस | के.वाय.सी. पूर्तता न केल्यास आमसभेत आपली बाजु मांडण्याबाबत. |
| १० | १९.०९.२०२३ | वेबसाईटद्वारे ग्राहकांना महत्वाची सूचना | के.वाय.सी. अद्ययावत करण्यासंबंधी सूचना |
| ११ | २२.०७.२०२४ | अहवाल २०२३—२०२४ | विषय क्र. १२ सदस्यत्व रद्द करण्याबाबत |
| १२ | ०९.०८.२०२४ | वर्तमानपत्राद्वारे कारणे दाखवा नोटीस | के.वाय.सी. पूर्तता न केल्यास आमसभेत आपली बाजु मांडण्याबाबत. |

के.वाय.सी. पुर्तता नसल्यामुळे रिझर्व्ह बँकेकडुन बँकेवर होणारी कारवाई टाळण्यासाठी आपणांस के.वाय.सी. पुर्ण करण्यासाठी अंतिम संधी देण्यात येत आहे. आपणास वारंवार दिलेल्या संधीस आपण कोणताही प्रतिसाद दिला नाही किंवा के.वाय.सी. पुर्ण करण्याची दखल घेतली नाही.

सदर कारणे दाखवा नोटीस व्दारे आपणास **अंतिम संधी** देण्यात येते की. या नोटीसच्या दिनांका पासून ३० दिवसाच्या आत के.वाय.सी. ची पुर्तता करावी अन्यथा के.वाय.सी. सादर न करण्याच्या आपल्या कृती बद्दल महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ३५ (१) व नियम १९६१ (नियम क्र. २८ व २९) अनुसार तसेच बँकेच्या उपविधी क्रमांक २३(i) आणि २४ (i), २४(j) अनुसार आपले सदस्यत्व रद्द का करण्यात येवू नये हयाचा खुलासा बँकेस किवा बँकेच्या दि. २७.०९.२०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता छत्रपती सभागृह, छत्रपती नगर, नागपूर–४४००१५ येथे आयोजीत केलेल्या भागधारकांच्या सर्वसाधारण सभे समक्ष प्रत्यक्ष उपस्थित राहुन तोंडी अथवा लेखी म्हणणे सादर करावे.

आपला वरील प्रमाणे खुलासा असमाधानकारक आढळल्यास अथवा आपण कोणताही खुलासा सादर न केल्यास, बँकेच्या उपविधी क्रमांक २३(i) आणि २४ (i), २४(j) तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, च्या कलम ३५ (१) व नियम १९६१ (नियम क्र. २८ व २९) अनुसार आपले सदस्यत्व रद्द करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

K.Y.C. पूर्तता करण्यासाठी खालील कागदपत्रे बँकेत सादर करणे आवश्यक आहे:

आधार कार्ड, PAN कार्ड अथवा ड्रायविंग लायसन्स सोबत इलेक्ट्रिसिटी किंवा टेलेफोन बिल व पासपोर्ट साईझ फोटो.

हया बाबत आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. अधिक माहितीसाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.नं. १) ९७६६११०३११

ठिकाण: नागपूर

Tirupati Urban Co-Op bank Ltd. Head Office

प्राधिकृत अधिकारी